मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# आयुक्त शेखर सिंह यांच्यासाथीने हाकला पालखी रथ

## आमदार महेश लांडगे यांनी केले संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे सारथ्य

**पिंपरी | प्रतिनिधी**

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचा ३४० वा पालखी सोहळ्याचे मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात उद्योगनगरी पिंपरी-चिंचवडमध्ये आगमन झाले. भाजपा आमदार महेश लांडगे आणि महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या सोबतीने पालखी रथाचे सारथ्य केले. राजकीय लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय प्रमुख यांनी वारकरी सांप्रदायाची पताका अभिमानाने खांद्यावर घ्यावी, असा सुरेख संगम यानिमित्ताने पहायला मिळाला.



भारतीय जनता पार्टी आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने संत तुकोबांच्या पालखीचे भक्ती-शक्ती चौक, निगडी येथे दिमाखात स्वागत करण्यात आले. अवघी उद्योगनगरी तुकोबांच्या नाम गजराने दुमदुमून गेली असून, टाळ -मृदुंगाच्या तालावर वारकरी ठेका धरत आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या वतीने पालखी सोहळ्याच्या स्वागताची सर्व तयारी केली होती.

आषाढी वारीनिमित्त संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा पिंपरी-चिंचवड शहरात भक्तिभावाने आणि जल्लोषात दाखल झाला. शहराच्या भक्ती-शक्ती चौकात वारीचे भव्य स्वागत करण्यात आले. या पार्श्वभूमीवर भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पालखी सोहळ्याचे सारथ्य करत श्रद्धेचा अनोखा संदेश दिला. शहरात पालखीचे आगमन होताच, टाळ-मृदुंगांच्या गजरात, हरिनामाच्या जयघोषात वारीच्या आगमनाने वातावरण भारावून गेले. वरुणराजानेही वारीच्या स्वागतासाठी हजेरी लावली, आणि त्या सरींमध्ये हजारो वारकऱ्यांचा मेळा एकत्रितपणे आकुर्डीतील मुक्कामाच्या दिशेने मार्गस्थ झाला.

> “ वारी ही महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आत्मा आहे. वारकऱ्यांची सेवा करणं हे आमचं कर्तव्य आणि भाग्य आहे. “आषाढी वारी” ही महाराष्ट्राच्या संस्कृतीतील एक विलक्षण आणि जगात कुठेही न सापडणारी परंपरा आहे. संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालख्या – त्या फक्त पालख्या नाहीत, त्या श्रद्धेच्या गंगा आहेत ज्या लाखो वारकऱ्यांच्या पावलांमधून पंढरीच्या दिशेने वाहत असतात. वारी म्हणजे नुसती भक्ती नव्हे, ती शिस्त, सेवा, साधना आणि समर्पण यांचा संगम आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

दरम्यान, भक्ती-शक्ती चौकात वारकऱ्यांसाठी विविध सेवा उपक्रम राबवले गेले. जीवनावश्यक वस्तूंचे वाटप, आरोग्य तपासणी शिबिरे, पाणी आणि फराळ व्यवस्था आणि स्वच्छतागृह व निवाऱ्याची सोय यामुळे वारकऱ्यांना अत्यंत सुलभ व सुरक्षित वातावरण मिळाले. लाडू, वॉटर बॉटल, रेनकोट, छत्री वाटप करण्यात आले. शहरातून पालखी सोहळा आकुर्डीच्या दिशेने मार्गस्थ झाला असून, हजारो भाविक, महिला, युवक आणि लहानग्यांनीही यामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला आहे. पिंपरी-चिंचवड शहराच्या वतीने सोहळ्याला दिलेल्या शिस्तबद्ध आणि आदर्श सहकार्याचे वारकऱ्यांनी मनापासून कौतुक केले.

# नदीत पडलेल्या मुलाचे प्राण अग्निशमन दलाच्या जवानांनी वाचविले

## फोटो स्टंट करताना पुलावरून पाण्यात पडला; अग्निशमन दलाच्या जवानांनी वाचविले

**पिंपरी | प्रतिनिधी**

जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे आज दुपारच्या सुमारास पुणे शहराकडे प्रस्थान होत असताना पिंपरी चिंचवड शहराच्या वेशीवरती असलेल्या दापोडी येथील मुळा नदीच्या पुलावरून एक मुलगा तोल जाऊन पाण्यात पडला होता. पिंपरी चिंचवड महापालिकेचे अग्निशामक दलाचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल होऊन त्यांनी या मुलाचे प्राण वाचवले.

वेदांत बोत्रे असं या १६ वर्षीय मुलाचे नाव आहे. वेदांत हा फोटो स्टंट करताना मुळा नदीच्या पुलावरून पाण्यात पडला होता. पाण्यात पडल्यावर तो नदीचा प्रवाह जास्त असल्याने तसेच नदीमध्ये असलेल्या बांधकामांच्या पिलरच्या लोखंडी कॉलमला अटकून राहिला होता.

याबाबतची माहिती मिळताच तात्काळ पिंपरी चिंचवड महापालिका अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी वेदांत याला बोट आणि ओबीएमच्या सहाय्याने सुखरूप पाण्यातून बाहेर काढून त्याच्या आई वडिलांच्या स्वाधीन केले आहे.

या बचाव कार्यात अग्निशामक दलाचे अधिकारी इतर कर्मचारी सहभागी झाले होते.



# धोकादायक वाड्यांची वीज, पाणी तोडणार!

## धोकादायक झालेले वाडे रिकामे करण्यासाठी पुणे महापालिकेचा निर्णय



**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील धोकादायक इमारती आणि वाड्यांच्या महापालिकेने नोटीस दिल्या असून या धोकादायक इमारतीचे बांधकाम काढून घ्यावे, असे महापालिका प्रशासनाने सांगितले आहे. मात्र याकडे दुर्लक्ष करत ३७ वाडा मालक आणि भाडेकरू यासाठी विरोध करत आहेत. त्यामुळे या वाड्यांची वीज जोडणी तसेच पाणी पुरवठा खंडित करण्याचा निर्णय पुणे महापालिकेने घेतला आहे. धोकादायक झालेले हे वाडी रिकामे करण्यासाठी मदत मिळावी, असे पत्र महापालिकेने पोलिसांना दिले आहे.

शहराच्या मध्यवर्ती पेठांच्या भागांमध्ये अनेक जुने वाडे आहेत. या वाड्यांमध्ये जागा मालक आणि भाडेकरू असा जुनाच वाद सुरू असल्याने याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे या वाड्यांना धोका निर्माण होऊन दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे हे वाडे रिकामे करावेत, अशी नोटीस पुणे महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने दिल्या आहेत. मात्र शहराच्या मध्यवर्ती पेठांमधील धोकादायक असलेले ३७ वाडे पाडण्यासाठी नागरिकांकडून विरोध केला जात आहे. या पार्श्वभूमीवर या वाड्यांना देण्यात आलेले वीज जोड आणि पाणी पुरवठा जोडणी तोडण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

पुणे शहरात सद्यस्थितीला सुमारे दोन हजार ८०० जुने वाडे आहेत. काही वर्षांपूर्वी जुन्या वाड्यांची संख्या अधिक होती. अनेक जुन्या वाड्यांचा पुनर्विकास करण्यात आला असून तेथे उंच इमारती उभ्या राहिल्या आहेत. मात्र, काही वाड्यांमध्ये राहत असलेले जुने भाडेकरू आणि वाडा मालक यांच्यात वाद आहेत. त्यामुळे त्यांचा पुनर्विकास रखडला असून ते धोकादायक झाले आहेत. लाकूड आणि मातीचा वापर करून बांधलेले हे वाडे पावसाळ्यात कोसळण्याच्या काही घटना घडल्या आहेत. यामध्ये जीवितहानी देखील झालेली आहे. त्यामुळे पुन्हा अशा प्रकारच्या दुर्घटना घडू नये यासाठी महापालिका जुन्या वाड्यांचे सर्वेक्षण करून त्यांना नोटीस देते.

महापालिकेने यंदाच्या वर्षी पावसाळा सुरू होण्यापूर्वी शहरातील तब्बल ११६ धोकादायक वाड्यांना नोटीस दिल्या आहेत. यापैकी ७६ वाडे आतापर्यंत उतरविण्यात आले आहेत. पुढील आठवड्याभरात काही वाडे उतरविण्याची तयारी संबंधित जागा मालकांनी केली आहे. मात्र ३७ वाडे मालकांकडून वाडे उतरविण्यास विरोध होत आहे. काही ठिकाणी पर्यायी व्यवस्था नाही, तर मालकी हक्क व अन्य वाद असल्याने हा विरोध होत आहे. धोकादायक वाडा कोसळल्यास होणारी जीवितहानी टाळण्यासाठी महापालिका प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

### सर्वात जास्त धोकादायक वाडे रविवार पेठत

» शहरातील धोकादायक झालेल्या वड्यांना महापालिकेने नोटीस बजाविल्या आहेत. ते पाडण्यासाठी सर्वात अधिक वाडे रविवार पेठ येथील असून त्यांची संख्या ९ इतकी आहे. त्या पाठोपाठ भवानी पेठ, शुक्रवार पेठ, घोरपडी पेठ येथे प्रत्येकी पाच, बुधवार पेठेत चार, नाना पेठेत तीन, सदाशिव आणि गुरुवार पेठेत प्रत्येकी दोन आणि शनिवार पेठेत एका वाड्याचा समावेश आहे.

> “ शहरातील ३७ धोकादायक वाडे मालकांना वारंवार नोटीस बजावल्या आहेत. त्यांच्याशी चर्चा करून काही पर्याय देखील सुचवले आहेत. मात्र त्यांचा विरोध कायम आहे. कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी वाडे रिकामे करण्यासाठी वीज आणि पाणी तोडण्यात येणार आहे.
>
> **- राजेश बनकर, अधिक्षक अभियंता.**

# हिंजवडी आयटी पार्कमधील अनधिकृत बांधकामांवर थेट गुन्हे!

## आयटी पार्कमध्ये 15 नैसर्गिक प्रवाहांवर अतिक्रमण करून ते अडविल्याचे निदर्शनास




**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कमधील जलकोंडीला नैसर्गिक जलप्रवाहांवरील अतिक्रमण कारणीभूत ठरल्याचे सर्वेक्षणातून समोर आले आहे. आयटी पार्कमध्ये १५ नैसर्गिक प्रवाहांवर अतिक्रमण करून ते अडविल्याचे निदर्शनास आले आहे. हे प्रवाह अडविणाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल करण्याचे निर्देश पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी गुरुवारी दिले.

नैसर्गिक ओढे-नाल्यांचा प्रवाह खंडित केल्यामुळे हिंजवडी टप्पा एक, दोन आणि तीन, तसेच मेट्रो मार्गासह परिसरात पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचत आहे. यामुळे वाहनधारकांसह नागरिकांना अडचणी येत असल्याने खासदार श्रीरंग बारणे, आमदार शंकर मांडेकर यांच्या उपस्थितीत आयुक्त डॉ. म्हसे यांनी विविध प्रशासकीय यंत्रणेच्या अधिकाऱ्यांची गुरुवारी संयुक्त बैठक घेऊन प्रलंबित कामे तातडीने करण्याचे निर्देश दिले.

पीएमआरडीए, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आणि इतर हद्दीत नियमांचा भंग करून बांधकामे करण्यात आली आहेत. ओढे, नाल्यांचा नैसर्गिक प्रवाह जवळपास १५ ठिकाणी काही कंपन्या, विकासक आणि नागरिकांनी परस्पर रोखून दुसरीकडे वळविला असून, ही बांधकामे तातडीने थांबवून गुन्हे दाखल करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

हिंजवडीमध्ये पाणी साचण्याच्या ठिकाणी नागरी सुविधांची कामे गेल्या आठवड्यापासून विविध प्रशासकीय यंत्रणांमार्फत करण्यात येत आहेत. यात आयटी पार्कमधील रस्ते दुरुस्तीसह मेट्रो मार्गिकेलगत असलेला राडारोडा हटवणे, गटारे व नालेसफाई, खड्डे बुजवणे, अनधिकृत स्टॉल हटवणे आदी कामे झाल्याने बहुतांश प्रमाणात समस्या सुटल्या आहेत. मात्र, पावसाचा जोर कायम असल्यामुळे काही कामे करण्यास वेळ लागत आहे. ही कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देशही बैठकीत देण्यात आले.

### सर्वेक्षणात नेमके काय?

» हिंजवडी आयटी पार्कमध्ये डोंगरावरून खाली येऊन नदीत मिसळणाऱ्या ओढे आणि नाल्यांचे 'पीएमआरडीए'च्या अधिकाऱ्यांनी सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणात १५ ठिकाणी नैसर्गिक प्रवाह रोखण्यात आल्याचे समोर आले. नैसर्गिक प्रवाह रोखून त्या ठिकाणी अनेकांनी मोठी बांधकामे केली आहेत. या बांधकामांवर कारवाईचे पाऊल लवकरच 'पीएमआरडीए'कडून हाती घेण्यात येणार आहे.

# कामे करीत राहा, फार चिंता करू नका; देवेंद्र फडणवीस यांचा कार्यकर्त्यांना सल्ला

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विकासकामांचे उद्घाटन व भूमिपूजन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले, त्या वेळी ते बोलत होते.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

सतत काम करीत राहा. आपण केलेल्या कामाचे श्रेय कोणी घेऊ शकत नाही. लोकांना सर्व माहीत आहे. त्यांनी केलेल्या कामाचे श्रेय त्यांना घेऊ द्या. फार चिंता करू नका, असे सांगत 'ये पब्लिक हैं सब जानती हैं' असा सबुरीचा सल्ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपच्या कार्यकर्त्यांना दिला.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विकासकामांचे उद्घाटन व भूमिपूजन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले, त्या वेळी ते बोलत होते. भोसरी येथे मंगळवारी (दि. 17) झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्ता मेळाव्यात पिंपरी-चिंचवडचा विकास केवळ अजित पवारांनी केला. सन 2017 नंतर महापालिकेत भ्रष्टाचार बोकाळला आहे, असे जाहीर आरोप उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत करण्यात आले



तो धागा पकडून भाजपचे आमदार महेश लांडगे यांनी कार्यक्रमात जाहीर नाराजी व्यक्त केली. तो धागा पकडत मुख्यमंत्र्यांनी श्रेयाची अपेक्षा न ठेवता काम करीत राहण्याचा सबुरीचा सल्ला कार्यकर्त्यांना दिला. आपण केलेल्या कामांचे श्रेय कोणी हिरावून घेऊ शकत नाही, असे स्पष्ट केले. शहरात खेळांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्यास मुलांना खेळास प्रोत्साहन मिळेल, अशा सूचना त्यांनी महापालिका प्रशासनाला दिल्या.

महापालिकेच्या विकासकामांची माहिती आयुक्त सिंह यांनी दिली. तर, ज्येष्ठांच्या मदतीसाठी असलेल्या ज्येष्ठानुबंध अ‍ॅप व ट्रॅफिक बडी व्हॉट्स अ‍ॅप प्रणालीची माहिती पोलिस आयुक्त चौबे यांनी दिली. त्या प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी आभार मानले.

संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत नामदेव महाराज यांच्या भेटीचे संतसृष्टीचे लोकार्पण करण्यात आले. त्यात एकूण 25 शिल्पे आहेत. चिखली येथील जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज संतपीठातील प्रेक्षागृह व कलादालनाचे लोकार्पण करण्यात आले. शहरात 1 लाख 50 हजार देशी वृक्षलागवड मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला.

किवळे येथील मुकाई चौक कृष्णा हॉटेल ते लोढा स्कीमपर्यंत एक्स्प्रेस हायवेलगतचा 12 मीटर डीपी सर्व्हिस रस्ता, बापदेव मंदिर येथील किवळे गावातील मुख्य रस्ता ते एक्स्प्रेस हायवेपर्यंतचा सिम्बायोसिस महाविद्यालयामागील 18 मीटर डीपी रस्ता आणि विकासनगर येथील मुख्य रस्ता डांबरीकरणाचे भूमिपूजन करण्यात आले. गवळी माथा ते इंद्रायणीनगर चौकपर्यंतचा रस्ता अर्बन स्ट्रीट डिझाइनद्वारे कामाचे भूमिपूजन करण्यात आले. शहरातील दिव्यांग नागरिकांच्या घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्यास सुरुवात करण्यात आली.

### चऱ्होलीचा डीपी स्कीम रद्द करण्याचे आयुक्तांना आदेश

**» लोकांना विश्वासात घेऊन शहराच्या विकासाचे नियोजन करा. लोकांचा विरोध असल्याने चऱ्होली येथील टीपी स्कीम रद्द करा, असे आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी आयुक्त शेखर सिंह यांना कार्यक्रमातच दिले. ते म्हणाले की, जे करायचे आहे ते लोकांसाठी करा. भविष्याचे नियोजन करताना लोकांना विश्वासात घ्या. झपाट्याने वाढत असलेल्या शहराला काय देणार, हे ठरवा. शहराचे खेडेगाव करणार की काँक्रीटचे जंगल, हे भविष्यात विचारले जाईल, हे लक्षात ठेवा, असा सल्लाही त्यांनी दिला.**

### सूतगिरणी प्रकल्पाबाबत स्पष्टीकरण

**» कार्यक्रमात निविदा कधी प्रसिद्धी झाल्याची माहितीही महापालिकेने द्यावी. त्यामुळे तो प्रकल्प कधी तयार झाला, हे स्पष्ट होईल. बावचळलेले विरोधक आम्हीच काम केले, असे खोटे सांगत घंटा वाजवत आहेत. डीपी आणि टीपीबाबत शहरातील स्वयंघोषित तज्ज्ञमंडळी अफवा पसरवत आहेत. सन 2017 नंतर महापालिकेत भ्रष्टाचार झाल्याचे आरोप होत आहेत. पूर्वी शहराबाहेरचे लोक महापौर व स्थायी समिती चेअरमन ठरवत होते. भाजप काळापासून तो प्रकार बंद झाला आहे. मी पैलवान असून, थेट अंगावर घेतो, असा इशारा आमदार महेश लांडगे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नाव न घेतात्यांना दिला.**

# वडगावमध्ये एक सदस्यीय प्रभाग पद्धतीने निवडणूक

**वडगाव नगरपंचायतीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने प्रभाग रचना निश्चित करण्याचे आदेश दिल्यानंतर नगरपंचायत प्रशासनाने त्याची तयारी सुरू केली आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

वडगाव नगरपंचायतीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने प्रभाग रचना निश्चित करण्याचे आदेश दिल्यानंतर नगरपंचायत प्रशासनाने त्याची तयारी सुरू केली आहे. येत्या १७ जूनपासून प्रारूप प्रभाग रचना प्रक्रियेला प्रत्यक्ष सुरुवात होणार असल्याची माहिती नगरपंचायतीचे मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ. प्रवीण निकम यांनी दिली.

राज्य शासनाच्या निर्देशानुसार वडगाव नगरपंचायतीत एक सदस्यीय प्रभाग रचना करण्यात येणार असून १७ प्रभागांसाठी १७ सदस्यांची निवड होणार आहे. प्रत्येक प्रभागातून एक सदस्य निवडला जाईल. नगराध्यक्ष पदासाठी मात्र थेट जनतेतून निवड होणार आहे. प्रस्तावित प्रभाग रचना व आरक्षणामध्ये काही बदल होण्याची शक्यता असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

राज्य शासनाने मंगळवारी नगरपंचायतींना प्रभाग रचनेसाठी जनगणना निकष निश्चित करून आदेश दिले. त्यानंतर वडगाव नगरपंचायत सज्ज झाली असून बैठकीद्वारे निवडणूक प्रक्रियेची आखणी सुरू झाली आहे.

**प्रभाग रचना प्रक्रियेचा कालावधी**

११ ते १६ जून : प्रगणक गटांची आखणी, प्रारूप प्रभाग रचना करणे

१७ व १८ जून : जनगणनेच्या माहितीची पडताळणी करणे

१९ ते २३ जून : संबंधित क्षेत्रांची स्थळ पाहणी करणे

२४ ते ३० जून : गुगल मॅपवर प्रभाग नकाशे तयार करणे

१ ते ३ जुलै : नकाशावर निश्चित केलेल्या क्षेत्रांची प्रत्यक्ष पाहणी

४ ते ७ जुलै : प्रारूप प्रभाग रचनेच्या मसुद्यावर समितीची स्वाक्षरी

८ ते १० जुलै : मसुदा राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करणे




### सात वर्षांनंतर निवडणुकीची तयारी

**» २०१८ मध्ये वडगाव नगर पंचायतीची स्थापना होऊन पहिल्यांदा निवडणूक पार पडली. त्यानंतर जुलै २०२३ मध्ये वडगाव नगरपंचायतीची मुदत संपली होती. मात्र विविध कारणांमुळे निवडणुका लांबणीवर पडल्या. यामुळे आता तब्बल सात वर्षांनंतर निवडणुकीची प्रक्रिया सुरू होत असल्यामुळे राजकीय हालचालींना वेग आला आहे.**

**“ राज्य निवडणूक आयोग किंवा प्राधिकृत अधिकारी मसुद्याला मंजुरी देतील. प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करून त्यावर हरकती व सूचना मागविण्यात येतील. प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी होऊन त्यानुसार अंतिम प्रभाग रचना निश्चित केली जाईल आणि ती निवडणूक आयोगाकडे पाठवली जाईल.**

**- डॉ. प्रवीण निकम, मुख्याधिकारी, वडगाव नगरपंचायत**

# माळेगावची निवडणूक स्थानिक पातळीवर : शरद पवार

## माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे,येत्या दि. 22 जूनला निवडणूक प्रक्रिया पार पडली जाणार आहे

**पुणे | प्रतिनिधी**

माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीबाबत राज्याचे लक्ष वेधले गेले असले तरी ती एक स्थानिक निवडणूक आहे. त्यामुळे या निवडणुकीत टोकाची भूमिका घेण्याची आवश्यकता नव्हती, असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी व्यक्त केले.

बारामतीतील गोविंदबागेत पत्रकारांशी बोलताना पवार म्हणाले, "ही पूर्णपणे स्थानिक स्वरूपाची निवडणूक आहे. याकडे राज्यपातळीवरून विशेष लक्ष देण्याची गरज नव्हती. आजूबाजूच्या तालुक्यांचेही या निवडणुकीकडे फारसे लक्ष नाही."

या निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार हे स्वतः उमेदवार असल्याने, शरद पवार यांनी केलेले हे वक्तव्य अधिकच चर्चेचा विषय बनले आहे.

पवार पुढे म्हणाले, "या निवडणुकीबाबत काही विशिष्ट परिस्थिती निर्माण झाली. सुरुवातीपासूनच सर्वांना सोबत घेण्याचा दृष्टिकोन ठेवला असता, तर ही स्थिती उद्भवली नसती. आता ही निवडणूक १९ हजार सभासदांपुरती सीमित आहे. निकाल चार दिवसांत स्पष्ट होईल."



### मुख्यमंत्री फडणवीसांचे कौतुक

**» नुकतेच महाराष्ट्र सरकारने घेतलेल्या निर्णयांचे स्वागत करताना पवार म्हणाले की, एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने शेतकऱ्यांचे हित साधले जाईल.नुकतेच सरकारने १० महत्वाचे निर्णय मंत्रीमंडळ बैठकीत घेतले. यामध्ये कृषी क्षेत्रातील निर्णयांचा देखील समावेश आहे. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले. महाराष्ट्र सरकारने 500 कोटींचा निर्णय घेतला आहे. ऊस आणि बाकीचे पिके वापरण्याचे धोरण फायनल केले. हा फायद्याचे असेल म्हणून निर्णय घेतला.**

बारामती तालुक्यातील माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. येत्या दि. २२ जूनला निवडणूक प्रक्रिया पार पडली जाणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उमेदवारी अर्ज भरल्याने ही निवडणूक महत्वाची मानली जात आहे. शरद पवार यांच्या पॅनेलचे देखील उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. अशातच बारामतीत शरद पवार यांनी याबाबत प्रतिक्रिया दिली आहे.

### सूतगिरणी प्रकल्पाबाबत स्पष्टीकरण

**» ज्येष्ठ नेते चंद्रराव तावरे यांनी बारामतीतील सूतगिरणीबाबत काही वक्तव्य केले होते. यावर प्रतिक्रिया देताना शरद पवार म्हणाले, "बारामतीत कधीच सूतगिरणी झाली नाही. एकेकाळी येथे कापूस पिकत होता, मात्र आता नाही. त्यामुळे संपूर्ण तालुक्याला सहभागी करून घेण्याची इच्छा असूनही, कापसाच्या अनुपस्थितीमुळे हा प्रकल्प पुढे नेण्यात आला नाही."**

एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने शेतकऱ्यांचे हित साधले जाईल. नुकतेच सरकारने १० महत्वाचे निर्णय मंत्रीमंडळ बैठकीत घेतले. यामध्ये कृषी क्षेत्रातील निर्णयांचा देखील समावेश आहे. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले. महाराष्ट्र सरकारने 500 कोटींचा निर्णय घेतला आहे. ऊस आणि बाकीचे पिके वापरण्याचे धोरण फायनल केले. हा फायद्याचे असेल म्हणून निर्णय घेतला.

पवार म्हणाले की, आजूबाजूला जे तालुके आहेत, त्यांचे लक्ष इथे नाही. बारामतीत सूतगिरणी झालीच नाही. एकेकाळी बारामती हा कापसाचा भाग होता. परंतु, आता कापूस इथे राहिला नाही. म्हणजेच पूर्वी बारामती कापसासाठी ओळखली जात होती, असे बारामतीत सूतगिरणी का झाली नाही, यावर त्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. या निवडणुकीकडे राज्याचे लक्ष लागले आहे असे कसे म्हणता येईल? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित करीत हा स्थानिक प्रश्न आहे. याचा अर्थ, ही निवडणूक फक्त स्थानिक पातळीवरची आहे. याकडे राज्याने लक्ष देण्याची गरज नाही. अशी पुस्टी शरद पवार यांनी जोडली.

# मोदींच्या नातेवाईकांकडून दर्शनासाठी घेतले पैसे

## श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे आर्थिक लुटमार होत असलेल्या घटनेबाबत माहिती देत खंत व्यक्त केली.

**पुणे | प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे येणाऱ्या भाविकांची वेगवेगळ्या माध्यमातून लूट केली जाते. त्याचा प्रत्यय अनेकदा भाविकांना येत असतो. त्यामध्ये आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या घरातील सदस्यांनाही या लुटारू एजंटांनी सोडले नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भावजय, पुतणी व जावई हे दर्शनासाठी आले असतांना त्यांच्याकडूनही झटपट दर्शनासाठी सुमारे पंधराशे रुपये घेतले. हा गंभीर प्रकार मंगळवार (दि.१७) रोजी घडला.

श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे एसटी बसस्थानकासमोर पोलिसांचे बॅरेकेट लावून बसलेल्या खासगी एजंटांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कुटुंबातील व्यक्तीकडून एक हजार रूपये घेवून मंदिराकडे सोडले आणि मंदिराकडे घेवून जाणाऱ्या मोटार सायकलस्वाराने त्यांच्याकडे दर्शनासाठी पाचशे रूपयांची मागणी केली असल्याचे सोनल मोदी यांनी सांगत नाराजी व्यक्त केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कुटुंबातील पुतणी, भावजय, जावई तसेच सोनल प्रल्हाद मोदी, ज्योतिबेन मोदी, विराग मोदी, नतनाबेन मोदी यांनी कोणतीही शासकीय सुविधा न घेता दर्शन घेतले. सोनल मोदी यांच्याबरोबर नरेंद्र मोदी यांची भावजय वयोवृध्द असल्याने आणि चालताना त्यांना थकवा येत असल्याने त्यांनी एजंटाबरोबर झालेली तडजोड स्वीकारत एक हजार रुपये दिले.

त्यानंतर एजंटांनी बॅरेकेट बाजूला केले. त्यांना मंदिर रस्ता दाखवण्यासाठी मोटार सायकल स्वारास पाठविले. त्यानेही मंदिराजवळ गेल्यानंतर दर्शनासाठी पाचशे रूपयांची मागणी केली. मात्र, त्यास पैसे दिले नाही. मंदिरामध्ये जाण्यासाठी अगोदरच मंदिरातील गुरुजींना माहिती दिली असल्याने मंदिरात कुणी पैसे मागितले नसल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पुतणी सोनल मोदी यांनी सांगितले.



घोडेगाव येथील हरिश्चंद्र मंदिरातील शिवलिंगाचे दर्शन घेवून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कुटुंबातील सदस्यांनी समाधान व्यक्त केले.यावेळी हरिश्चंद्र मंदिर संस्थेचे अध्यक्ष प्रशांत काळे, राजेश काळे, ॲड. संजय आर्विकर, गजानन काळे उपस्थित होते.

### अधीक्षकांसमोर ऑल इज वेल

**» श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे येणाऱ्या भाविकांची वेगवेगळ्या माध्यमातून लूट केली जाते. पुणे जिल्हा ग्रामीण पोलीस दलाचे पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल्ल श्री क्षेत्र भीमाशंकर येथे आले असता पोलीस प्रशासनाने सर्व व्यवस्थित असल्याचे भासविले. परंतु ते गेल्यानंतर लगेच पुन्हा श्री क्षेत्र भीमाशंकर येथे भाविकांची आर्थिक लुटमार चालू झाली.**

### मोदी कुटुंबीयांची खंत

**» श्री क्षेत्र भीमाशंकरहून घोडेगाव येथे बुधवार (दि.१८) सकाळी श्री क्षेत्र हरिश्चंद्र मंदिर येथील पवित्र शिवलिंगाचे दर्शन व जलाभिषेक करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कुटुंबातील व्यक्ति आले असता त्यांनी पत्रकारांशी चर्चा करताना क्षेत्र भीमाशंकर येथे आर्थिक लुटमार होत असलेल्या घटनेबाबत माहिती देत खंत व्यक्त केली.**